# श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान

## *महाशिवरात्री*

ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### भगवान शिवाला स्वतःचे नाम आवडते

महाशिवरात्रीच्या सत्संगामध्ये आपण 'ॐ नमः शिवाय' ही मंत्रधून गायली. आपण पुन्हापुन्हा भगवंताच्या नावाचा जप केला. 'ॐ नमः शिवाय.' 'मी भगवान शिवाला नमन करतो, जे मंगलमय आहेत, जे सर्वांचा आत्मा आहेत आणि अंतरात्मादेखील आहेत.'

श्रीगुरुमाईंनी आपल्याला समजावून सांगितले की, भगवंताला स्वतःचे नाम आवडते, जेव्हा आपण त्यांचे नाम घेऊन त्यांना साद घालतो, तेव्हा ते खूप प्रसन्न होतात. श्रीगुरुमाई जेव्हा असे म्हणाल्या, तेव्हा मला लगेच त्या गोष्टी आठवल्या, ज्या मी मोठी होत असताना ऐकल्या होत्या. त्या गोष्टी प्राचीन भारताच्या महागाथा होत्या, ज्या मूलतः पुराणांमध्ये व अन्य शास्त्रग्रंथांमध्ये लिपिबद्ध केल्या गेल्या आहेत. गत युगांमध्ये अशा लोकांचे असंख्य वृत्तान्त आढळून येतात, जे दूरवरच्या पर्वतशिखरावर जाऊन कित्येक महिने, कित्येक वर्षे तपस्या करत असत. तपस्या करत असताना ते एकाग्रचित्ताने त्यांच्या इष्टदेवतेच्या, बहुतेक वेळा भगवान शिवाच्या नामाचा जप करत असत. अखेरीस, त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन भगवंत त्यांच्यासमोर प्रकट होत आणि त्यांना मनोवांछित वरदान देत असत.

या कथा वाचणे मला फार आवडत असे, परंतु एक प्रश्न माझ्या मनात पुन्हापुन्हा उद्‌भवत असे. मला असे वाटायचे की, या कथांमधील पात्रे ही बऱ्याचदा भगवान शिवाकडून एखादा वर मागण्याच्या हेतूने त्यांना प्रार्थना करत असत. कधीकधी त्यांनी मागितलेले वर श्रेष्ठ व पुण्यकारी असत, जसे की, धर्माचे रक्षण करणे, मानवतेचे उत्थान करणे. कधीकधी एखादा तत्कालिक वा वैयक्तिक लाभ व्हावा ही इच्छा मनात बाळगून ते तपस्या करत. आणि *कधीकधी* तर प्रार्थना करणारी व्यक्ती ही स्पष्टपणे लोभाचे प्रतीकच असे; ती व्यक्ती आपली सत्ता-संपत्ती व प्रभुत्व वाढवण्याच्या लोभापायी तपस्या करत असे. देवतागणांना व पृथ्वीतलावरील मानवांना भगवान शिवाचे आशीर्वाद प्राप्त करण्याची जितकी इच्छा होती, अगदी तितकीच असुरगणांनादेखील भगवान शिवाचे आशीर्वाद प्राप्त करण्याची इच्छा होती.

इतकेच नव्हे तर दैत्यराज रावण, ज्याच्या अनैतिक कृत्यांच्या पार्श्वभूमीवर बहुतांश रामायण घडले, त्यालादेखील भगवान शिवाचा अनन्य भक्त म्हटले जाते. त्याची अदम्य शक्ती ही मुख्यत्वे भगवान शिवाला प्रसन्न करण्यासाठी त्याने केलेल्या घोर तपश्चर्येमुळे प्राप्त झालेली होती.

म्हणून मी विचार करत असे, “असे कसे शक्य आहे, की भगवंत, जे सर्वज्ञ आणि पूर्णतः निर्लिप्त आहेत, ते या *सर्व* लोकांना जे मागेल ते देतात, मग ती व्यक्ती कोणीही असो, तिने काहीही केलेले असो आणि तिचा कोणताही हेतू असो? असे ‘केवळ’ यासाठी का की, त्या व्यक्तीने भगवंताच्या नामाचा जप केला होता?”

जी गोष्ट मी नीट समजू शकत नव्हते, निदान बौद्धिक स्तरावर तरी नाही, ती होती भगवंताच्या करुणेचे स्वरूप. भगवान शिव दयाळू आहेत. ते भक्तवत्सल आहेत. ते आशुतोष आहेत, म्हणजे ते सहज प्रसन्न होतात आणि मनापासून त्यांची प्रार्थना करणाऱ्यांना ते त्वरित प्रतिसाद देतात. आपण जेव्हा भगवंताला साद घालतो, जेव्हा आपण त्यांचे नाम घेतो, तेव्हा आपल्यातील अवगुण हे गौण ठरतात. भगवंत आपल्या भेटीस *निश्चितच* येतील. ते अंतरात्मा आहेत, आपल्या अंतरी विद्यमान असलेले परमेश्वर आहेत. आपल्या अंतरी विद्यमान असलेल्या या दिव्यत्वाची अनुभूती करण्यासाठी, भूतकाळात आपण केलेल्या प्रत्येक पापाचे प्रायश्चित्त करण्याची आवश्यकता नाही. भगवंताच्या प्रेमास पात्र होण्यासाठी, आपण आत्ता जसे आहोत, त्यापेक्षा ‘आणखी चांगले’ बनण्याची गरज नाही. आपल्याला फक्त *स्मरण करायचे* आहे. भगवंत नेहमी इथेच आहेत, ते *अगदी इथेच* आहेत, आपल्यासोबत आहेत आणि ते आपल्याला पारखत नाहीत.

आपण आपल्या कर्मांसाठी उत्तरदायी नाही, असे माझ्या म्हणण्याचे तात्पर्य नव्हे. आणि मी असेही म्हणत नाही की, आपण आपल्या जीवनात सत्कर्मे करण्याचा प्रयत्न करू नये, आपण दयाळू, उदार आणि संवेदनशील होण्याचा प्रयत्नच करू नये, आपण आपल्या ग्रहाची व यावरील रहिवाशांची काळजी घेऊ नये. श्रीगुरुमाई आपल्या शिकवतात की, मानव म्हणून आपले हे कर्तव्य आहे की, आपण नेमके हेच करायला हवे. जगामध्ये धर्म टिकून राहावा यासाठी, पौराणिक कथांमध्येदेखील सावधगिरीच्या काही इशाऱ्यांचा उल्लेख आहे. एखाद्या असुराला भगवंत कदाचित वरदान देतीलही, परंतु त्या असुराने जर स्वतःच्या पापावर, स्वतःच्या लोभावर आणि अहंकारावर अंकुश लावला नाही, तर त्याचा अंत अटळ आहे.

मुद्दा असा आहे की, भगवंताची करुणा आणि ती अनुभवण्याची आपली क्षमता यांचा स्तर उचित आणि अनुचित यांच्या पलीकडे आहे. इतकेच नव्हे तर, शास्त्रग्रंथ आपल्याला हेच सांगतात की, भगवंताचे नाम हे मुळातच शुद्धिकारक आहे. भगवंताचा नामजप करणे हे मुळातच एक पुण्यकर्म आहे—असे कर्म की, जे मांगल्याची निर्मिती करते आणि त्यात वृद्धी करते. शिवपुराणात असे पूर्णच्या पूर्ण अध्याय आहेत की, ज्यांमध्ये शिवनामाचा महिमा गायला आहे. यांपैकी एका अध्यायाचे कथाकार सूत ऋषी असेही म्हणतात की, "मनुष्य जेवढी पापे करू शकतो त्याहीपेक्षा अधिक पापे नष्ट करण्याचे सामर्थ्य भगवान शिवाच्या नामात आहे." ते वर्णन करतात की, भगवन्नाम हे समस्त पापे छाटून टाकणारी 'कुऱ्हाड' आहे, भगवंताचे नाम हे 'पापांच्या महाज्वाळांनी पोळलेल्या मनुष्यांना' सुख-शांती व शीतलता देणारे 'अमृत' आहे आणि हे नाम 'मोक्षा'[१]चे साधन आहे.

महाशिवरात्रीच्या सत्संगात, श्रीगुरुमाई फक्त एवढेच म्हणाल्या की, भगवंताला त्यांचे स्वतःचे नाम आवडते आणि आपण जेव्हा त्यांना साद घालतो, तेव्हा ते प्रसन्न होतात. या एका गोड आणि उद्‌बोधक वाक्याने चिंतनमननासाठी माझ्यासमक्ष अनेक संभाव्य मार्ग प्रकाशित केले आहेत. यामध्ये अनेकानेक कल्पना आहेत, ज्यांवर मनन करता येऊ शकते. याच्याशी निगडित कितीतरी असे पैलू आहेत, ज्यांचे अधिक अन्वेषण करता येऊ शकते.

तेव्हा मी विचार करते आहे : तुम्हाला या शिकवणीवर चिंतन करण्याची संधी जर मिळाली असेल, तर तुमच्या चिंतनमननातून तुम्हाला काय उमगले आहे? भगवान शिवाला स्वतःचे नाम आवडते हे ऐकल्यावर तुमच्या मनात कोणकोणते विचार येतात?

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

[१] शिवपुराण : भाग १; श्री जे. एल. शास्त्री यांच्याद्वारे संपादित [दिल्ली; मोतीलाल बनारसीदास, १९५०], अध्याय २३, पृ १५२.